SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : १८९ ● पुणे ● मंगळवार, दि. १० जून २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



रुपेश घुले पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा 3



धायरीमध्ये ड्रेनेज लाईनचे काम तात्काळ सुरू 4

## ठळक बातम्या

### डॉक्टर तरुणाने संपवलं आयुष्य

पुणे (आरंभ पर्व) : खासगी रुग्णालयातील निवासी डॉक्टर तरुणाने वसतिगृहात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. डॉक्टर तरुणाच्या आत्महत्येमागचे निश्चित कारण समजू शकले नसून, कोरेगाव पार्क पोलिसांनी तरुणाचा मोबाइल तांत्रिक विश्लेषणासाठी ताब्यात घेतला आहे. डॉ. श्याम व्होरा (वय 28) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी घटनास्थळी एक चिठ्ठी सापडली आहे. रविवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास कोरेगाव पार्क पोलिसांना माहिती मिळाली होती.

### पुण्यात आणखी एका 'वैष्णवी'चा बळी

पुणे (आरंभ पर्व) : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण ताजे असतानाच पुण्यात पुन्हा एकदा विवाहितेच्या आत्महत्येने हुंडाबळीची घटना समोर आली आहे. माहेरहून पाच लाख रुपये तसेच हुंड्यात सोन्याचे दागिने आणावेत म्हणून सासरकडील नातेवाइकांनी छळ केल्याने महिलेने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना नगर रस्त्यावरील केसनंद भागात घडली. महिलेला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीला वाघोली पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी सासू, दीर, तसेच मामे सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सूरज पाठक असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी सासू सुनीता पाठक (वय 45), दीर नीरज पाठक (वय 23), मामे सासरे अरुण उपाध्याय, अरविंद उपाध्याय (सर्व रा. केसनंद) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत स्वातीच्या आईने वाघोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### सुशील हगवणेला पुणे पोलिसांकडून अटक

पुणे (आरंभ पर्व) : वैष्णवी हगवणेचा दीर सुशील हगवणेला पुणे पोलिसांनी सोमवारी अटक केली. शस्त्र परवाना मिळवण्यासाठी पुणे पोलिसांना खोटी माहिती असलेला वास्तव्याचा पुरावा सादर करून परवाना मिळवल्याप्रकरणात पुण्यातील कोथरूड आणि वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात वैष्णवी हगवणेचा पती शशांक आणि दीर सुशील हगवणे यांचेविरोधात फसवणुकीचे दोन स्वतंत्र गुन्हे गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. वैष्णवी हगवणे यांचा मृत्यू झाल्यानंतर हगवणे बंधूंविरोधात दाखल झालेला हा दुसरा गुन्हा आहे. हगवणे बंधूंनी शस्त्र परवाने मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेत खोटी माहिती दिली होती. खोट्या माहितीच्या आधारे त्यांनी शस्त्र परवाना मिळविला होता. शस्त्र परवाना मिळवताना दोघांनी दिलेल्या माहितीत विसंगती असल्याचे चौकशीत उघड झाले. त्यांनी पुणे येथील कोथरूड व वारजे या भागात भाड्याने राहात असल्याची कागदपत्रे सादर केली होती. काहीच महिने येथे राहात असताना त्यांनी अशा पध्दतीने रहिवासी असल्याचे दाखवले होते. हा प्रकार समोर आल्यानंतर पुणे पोलिसांनी दोन भावावर स्वतंत्र गुन्हे दाखल केले होते.

# पुणे लोकलच्या गर्दीवर उपाय हवेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील लोकलना मुंबईसारखी तुडूंब गर्दी नसली तरी सकाळी व सायंकाळी धावणाऱ्या लोकलचे डबे प्रवाशांनी खचाखच भरलेले असतात. अनेक प्रवाशांना 'फूट बोर्ड'वर उभे राहून प्रवास करणे भाग पडते. त्यामुळे कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मुंबईतील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पुणे विभागाने पावले टाकण्याची गरज आहे. सकाळची ८ वाजून २० मिनिटांची लोणावळा-पुणे व सायंकाळची ६ वाजून २ मिनिटांची पुणे-लोणावळा या दोन्ही लोकलना प्रचंड गर्दी असते.

गर्दी वाढल्यानंतर अनेक प्रवाशांना डब्यात प्रवेश करणे अशक्य होते. त्यामुळे फूट बोर्डवर उभे राहून प्रवास करणारे काही जण ट्रॅकवर पडून जखमी होतात किंवा मृत्युमुखी पडतात. त्यामुळे प्रशासनाने डब्यांची संख्या वाढविणेही आवश्यक आहे.

काही प्रवासी डब्यात जागा असूनही 'फूट बोर्ड'वर उभे राहतात. तर काही जणांना दारापाशी थांबणे अटळ बनते. प्रवासी गाड्यांमध्ये आरक्षित डब्यांच्या तुलनेत जनरल डब्यातील बरेच प्रवासी 'फूट बोर्ड'वर उभे राहूनच प्रवास करतात.

वाहतूक कोंडी तसेच तिकिटाचा दर केवळ १५ रुपये आहे. त्यामुळे लोणावळा लोकलची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे.

गेल्या तीन वर्षांत रेल्वे डब्यातून खाली पडणे, रूळ ओलांडताना दुर्घटना होणे अशा विविध कारणांमुळे पुणे विभागात ९२२ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे.



## निवडणुकांच्या तोंडावर काँग्रेस शहराध्यक्ष बदलण्याच्या हालचाली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षातील एका गटाने पुन्हा शहराध्यक्ष बदलासाठी उचल खाल्ली आहे. पुण्याचे निरीक्षक सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्यासमोर शहराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्या मंडळींनी लॉबिंग केले, तर विद्यमान अध्यक्षांनाच कायम ठेवण्यात यावे, अशी मागणी त्यांच्या समर्थकांकडून करण्यात आली. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाटील यांनी सोमवारी काँग्रेस भवनात पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. या वेळी त्यांनी काही पदाधिकाऱ्यांशी खासगीत चर्चा करून आगामी पालिका निवडणुकीत पक्षाची सत्ता आणण्यासाठी काय करता येईल, हे जाणून घेतले. या वेळी काही पदाधिकाऱ्यांनी शहराध्यक्षबदलाची मागणी केल्याचे समजते. काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष म्हणून अरविंद शिंदे कार्यरत असून, विधानसभा निवडणुकीच्या वेळीही या गटाने शहराध्यक्ष बदलासाठी मोठे लॉबिंग केले होते. तथापि, त्या वेळी पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी निवडणुकीच्या तोंडावर बदल नको, अशी भूमिका घेतल्याने त्यांना गप्प बसावे लागले होते. आता संघटनात्मक बदलांच्या पाहणीसाठी प्रदेश काँग्रेस कमिटीनेच बंटी पाटील यांना पुण्यात पाठविले असल्याने या गटाने पुन्हा उचल खाल्ली आहे. वास्तविक, मार्च महिन्याच्या सुरुवातीस ते पुण्यात येऊन गेले होते व महिना अखेरीला पुन्हा येणार होते. तथापि, पक्षश्रेष्ठींकडून पुण्याच्या अहवालाबाबत तगादा लावल्याने आज सायंकाळी ते तातडीने पुण्यात आले, असे समजते.

## आळंदी म्हातोबा ग्रामस्थांनी लोकवर्गणीमधून उभे केले शेततळे



**आमच्याकडे सदरील देवस्थानच्या मालमत्तेबाबतचे विस्तृत विवरण कागदपत्र बाराव्या शतकापासूनचे आहे.बाराव्या शतकानंतर पहिल्यांदाच या क्षेत्राचा विकास करण्यासाठी समस्त आळंदी म्हातोबा ग्रामस्थ आनंदाने एकत्र आले आहेत.यासाठी माझे सहकारी भगवान जवळकर, वाल्मीक जवळकर,सुभाष जवळकर, सचिन माथेफोड,कैलास शिवरकर,मोहन जवळकर,माऊली जवळकर,जालिंदर जवळकर तसेच कृती समिती मधील इतर सदस्य व सर्वच ग्रामस्थ दिवसरात्र मेहनत घेत आहेत. देवस्थानच्या जागेचा विकास करणे तसेच पुढील काळात उर्वरित जमीन ताब्यात घेणे ही या कृती समितीचे उद्दिष्ट आहे. - दत्तात्रय जवळकर, कृती समिती अध्यक्ष**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

हवेली तालुक्यातील आळंदी म्हातोबा येथील ग्रामस्थांनी गावपातळीवर तसेच परिसरातील देणगीदारांकडून मदत मिळवत सुमारे दीड एकराचे शेततळे देवस्थानच्या जागेमध्ये उभारले आहे.या गावचे जागृत असणारे ग्रामदैवत श्री म्हातोबा जोगेश्वरी आहे .या देवस्थानाच्या नावावर असणाऱ्या जमिनीची देखभाल करण्यासाठी गावामार्फत ट्रस्ट नेमण्यात आली होती .परंतु दरम्यानच्या कालखंडात सर्व विश्वस्त मयत झाल्याने जमिनीची देखभाल कोण करणार याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.त्यावेळी ग्रामसभा घेऊन गावच्या माध्यमातून ग्रामस्थांमधून दत्तात्रय जवळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक कृती समिती न्यायालयीन कामकाजासाठी व मालमत्ता देखभालीसाठी नेमण्यात आली होती. त्यानुसार या देवस्थानच्या एकूण जागेपैकी बावीस एकर शेतजमीन ओलिताखाली आणून त्या जागेचे उत्पन्न गावाला मिळवून द्यायचा निर्णय समस्त ग्रामस्थांनी ग्रामसभेत घेतला होता .त्या अनुषंगाने लोकवर्गणी मधून सदरील शेततळे बांधण्यात आलेले आहे.या शेततळ्याची पाणी साठवण्याची क्षमता दोन कोटी लिटर असून पाईप लाईन सहित अंदाजे तीस ते पस्तीस लाखापर्यंत खर्च जाण्याची शक्यता आहे.या शेततळ्यातील पाण्याच्या साठ्यावर उर्वरित जमिनीचा देखील पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे.या शेततळ्यात नवीन कालव्यातून पाणी सोडण्यात आलेले असून त्याच पाण्याचे जलपूजन डॉ अभिजित दरक, डॉ राहुल काळभोर,हभप चेतन महाराज माथेफोड, यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महावितरणचे अधिकारी सय्यद,सचिन माथेफोड , राजेंद्र काळभोर, विजय काळभोर ,सुवर्णा कांचन,नितीन करडे,सुनील तुपे,सुनील भोसले,राष्ट्रवादी हवेली अध्यक्ष दिलीप वाल्हेकर,महसूल कर्मचारी व केशव काका तिखे,प्रवीण काका राजगुरु , आळंदी म्हातोबा ग्रामपंचायत प्रशासन, वि. वि.सोसायटी सदस्य व ग्रामस्थं उपस्थित होते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज .. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272



# लोकलची जीवघेणी गर्दी, निरपराध प्रवाशांचे बळी

मुंबईची विस्तारीत उपनगरे असलेल्या दिवा-मुंब्रा दरम्यान खचाखच गर्दीने धावणाऱ्या लोकलमधील दरवाजात उभे असणारे काही प्रवासी खाली पडले आणि त्यातच काहींचे बळी गेले तर काही जखमी झाले. सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. या दिवशी मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले व ही दुर्घटना घडली अशी माहिती सुरुवातीला पुढे आली. नेमके किती मृत्युमुखी पडले किंवा नेमके किती जखमी झाले याची माहितीसुद्धा धड मिळत नव्हती. मुंबईच्या उपनगरी रेल्वेतून रोज पंचाहत्तर लाखांहून अधिक प्रवास करतात.

एवढ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर सीएसटी-चर्चगेटपासून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेल आणि विरार, पालघर, डहाणूपर्यंत लोकल्स धावत असतात. मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे. याच महामुंबईतून देशाच्या खजिन्यात सर्वात जास्त महसूल जमा होतो. याच महानगरातून देशाला सर्वात जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय ७५ लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते?

मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील दादर, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, कळवा, डोंबिवली, कल्याण तसेच अंधेरी, वसई-विरार या स्थानकांवर नेहमीच गर्दीचा कहर असतो. सीएसटीवरून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेलला जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल्स तुडुंब गर्दीने नेहमीच भरलेल्या असतात. कोंडवाड्यात जशी जनावरे दावणीला असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी व सीएसटीहून कसाराकडे जाणारी या लोकल जात असताना दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले.



धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वत:चा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही. देशात जिकडे तिकडे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहे. वंदे भारत ट्रेनची क्रेझ वाढत आहे. पण मुंबईतील लोकल्समधून रोज प्रवास करणारे लाखो प्रवासी मात्र वाऱ्यावर सोडले आहेत. रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत आहेत आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत.

गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार? सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या दोन वर्षांत एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या आहेत. जशी त्यांची संख्या वाढत आहे तसे विना एसी लोकल्स कमी होत आहेत. मुंबईत एसी लोकल्स हव्या आहेत, त्याला मागणीही बरीच आहे. एसी लोकल्समधून प्रवास करणारा वर्गही मोठ्या संख्येने आहे. पण सर्वसाधारण लोकल परवडते म्हणून त्या लोकलने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांवर अन्याय होता कामा नये याची दक्षता रेल्वे प्रशासनाने घेतली पाहिजे.

गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात ५१,८०२ लोकांचा मृत्यू झाला. मुंबईत रेल्वे अपघातात रोज सात ते आठ लोक मरण पावतात. पण त्याची कुठे बातमीही प्रसिद्ध होत नाही. 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी मुंबईच्या उपनगरी रेल्वेची अवस्था झाली आहे. सन २०२५ या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात ६६३ लोक ठार झाले. त्यातले २७२ जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर ३९१ जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडून मरण पावले किंवा जखमी झाले, असे प्रथमच घडले असावे. आता तरी राज्य सरकार, केंद्र सरकार व रेल्वे प्रशासन यांचे डोळे उघडणार आहेत की नाही? मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? प्रत्येक ट्रेनमध्ये प्रत्येक लोकलच्या डब्यात विनातिकीट अनेक प्रवासी असतात.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त धायरी, सिंहगड रोड परिसरात वृक्षारोपण !





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

जागतिक पर्यावरण दिन निमित्त खडकवासला भाजपा वडगाव धायरी मंडलातर्फे वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये मा. नगरसेवक राजाभाऊ लायगुडे,ॲड. प्रसन्नदादा जगताप,हरिदास चरवड ,निताताई दांगट ,राजश्रीताई नवले, श्रीकांत जगताप, ज्योती गोसावी,मंजूषा नागपुरे, सचिन मोरे,बाळासाहेब नवले,सागर भूमकर,सारंग नवले,अंनत दांगट, हेमंत दांगट, शहाजी वांजळे, विलास पोकळे,सचिन मनेरे,गणेश पोकळे,अतुल चाकणकर, विशाल उभे,अनिरुद्ध कोकणे,दत्तात्रय देशपांडे,मुक्ता पुंडे,ऋषाली शेकदार,समीर रूपदे,समीर रायकर,तुषार पोकळे,सागर वडणे ,नरसिंह राजपुरोहित, आदी मान्यवरांनी यामध्ये सहभाग नोंदवला. खडकवासला मतदारसंघ वडगाव बुद्रुक-धायरी मंडला अंतर्गत विविध भागात वृक्षारोपण करण्यात आले.

याचे संयोजन मंडलाध्यक्ष यशवंत (बापू )लायगुडे यांनी केले . वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी वृक्षारोपण करणे काळाची गरज असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. आपण आपल्या प्रत्येकाने पर्यावरण संतुलित राखण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात यावे. व प्रत्येकाने दरवर्षी एक तरी झाड लावण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.



**जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्त खडकवासला भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष सारंग नवले यांनी पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण केले. ते दरवर्षी नितीन माने वृक्षारोपण करून पर्यावरणाविषयी जनजागृती करत आहेत.**

## कोंढवा गेट ते आळंदीदर्शन बससेवा सुरू!

### सुभाष नाणेकर यांच्या पाठपुराव्याला यश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उत्तम नगर ,कोंडवे धावडे , तसेच परिसरातील इतर वारकरी व भाविक भक्तासाठी कोंढवा गेट ते आळंदी ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे.

उत्तम नगरचे माजी सरपंच सुभाष नाणेकर यांनी यासंबंधी सोमवारी पीएमपीएम एल अधिकाऱ्यांना भेटून बससेवेची मागणी केली होती.

अखेर त्यांच्या या मागणीचा विचार करून पीएमपीएमएलने कोंढवा गेट ते आळंदी ही बस सेवा सुरू केली आहे.

हभप आचार्य कीर्तनकार





सुधाकर महाराज कांडेकर यांच्या हस्ते हार नारळ फोडून व पेढे वाटून झाला.

याप्रसंगी कोथरूड डेपो मैनेजर सुरेंद्र दांगट, वाहक गणेश पोपळे,चालक दिगंबर लवटे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. खडकवासल्याचे आमदार आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रयत्नातून व सुभाषभाऊ नाणेकर यांच्या पाठपुराव्यातून आळंदीदर्शन बस सेवा चालू झाली .

यावेळी कीर्तनकार ब्रम्हचारी हभप सुधाकर महाराज कांढेकर, माजी जिल्हा परिषद सदस्या अनितातई इंगळे,

मा. सरपंच सुभाष नाणेकर, हभप कीर्तनकार गिरी गोसावी महाराज, हभप दत्तात्रय तोंडे महाराज, हभप संतोष पवार महाराज, सुभाष शेठे महाराज, सुरेंद्र कामठे,, भाऊ दांगट, कैलास नाणेकर, बाळासाहेब मांजरे, गुलाब जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात



### ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पाठीवर मुख्यमंत्री फडणवीस यांची थाप

- **आगामी काळात ॲड. जगताप यांना मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता!**

**पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेचे माजी आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांच्या कन्येच्या विवाह पुण्यात थाटामाटात पार पडला. ह्यानिमित्त महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आवर्जून उपस्थित होते. यावेळी त्यांच्यासोबत पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर ॲड .प्रसन्नदादा जगताप हे ही या विवाह निमित्त उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ॲड प्रसन्नदादा जगताप यांनी यावेळी स्वागत केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ॲड प्रसन्न दादा जगताप यांनाही नमस्कार केला व व पाठीवर थाप मारली. व थोडीशी त्यांच्यासोबत चर्चाही केली. ह्याची चर्चा सर्वत्र आजूबाजूला होत होती. ॲड प्रसन्नदादा जगताप हे एक उमद्या मनाचे नेतृत्व असल्यामुळे सर्वच नेते मंडळी हे त्यांना आवर्जून हक्काने बोलतात हे त्यानिमित्त दिसून येते. त्यांची पक्षाच्या वरिष्ठांशी सलगी या निमित्त दिसून आली. आगामी महानगरपालिका निवडणुका व इतर निवडणुकांमध्ये ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्याकडे फडणवीस कोणती जबाबदारी देतात की काय ? अशी ही कुजबूज सुरू झाली आहे.मोठ्या मनाने विधानसभे निवडणुकीमध्ये पक्षासाठी जीवाचं रान करणाऱ्या ॲड प्रसन्नदादा जगताप यांना आगामी काळामध्ये मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**



- **लेखिका – मनीषा लहारे. (बी.ए.,बी.एड.,एम.ए.,एम.एड.,पत्रकारिता)**
- **जिल्हा - अहिल्यानगर**
- **संपर्क – ८७८८९००३१८**

## 'सिंदूर' – एक स्त्रीच्या अस्तित्वाचे प्रतीक

**(दै. आरंभ पर्व)**

'सिंदूर' हा शब्द फक्त तीन अक्षरांनी बनलेला असला तरी एका भारतीय स्त्रीच्या निम्म्यापेक्षा अधिक आयुष्याचा तो एक भावनिक अविभाज्य घटक असून तो एका भारतीय स्त्रीच्या संपूर्ण आयुष्याशी घट्ट जोडलेला असतो. हे पवित्र नातं आहे सात जन्मांचे. कारण 'सिंदूर' हा शब्द म्हणजे फक्त लाल रंग नाही तर तो स्त्रियांच्या केसांच्या भांगात भरणारे सुहागाचे प्रतीक मानले जाते .

हा फक्त लाल रंगाचा एक लावण्यपूर्ण टिळा नसून तो एक भावनिकतेचे, धार्मिकतेचे, संस्कृतीचे आणि सामाजिकतेचे प्रतीक आहे. भारतीय स्त्रीसाठी सिंदूर हे तिच्या वैवाहिक आयुष्याचे, निष्ठेचे, प्रेमाचे, आणि वचनबद्धतेचे प्रतीक आहे. केसांच्या भांगात भरलेला हा सिंदूर स्त्रीच्या मनामध्ये एका नव्या जबाबदारीची जाणीव निर्माण करत असते. जसे एक उत्तम पत्नी, सून, नणंद, काकी, जाऊबाई, आई, सासू, आजी आणि समाजातील एक आदर्श स्त्री म्हणून घरात व समाजात वावरत असते.

हिंदू धर्मात कुंकवाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक शुभकार्यात कुंकवाचा वापर केला जातो. विवाहित महिलेच्या आयुष्यातील कुंकवाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तिने कपाळावर लावलेले कुंकू म्हणजे तिच्या सौभाग्याची ओळख असते म्हणून त्याला सौभाग्याचं लेणं मानलं जातं. सौभाग्याचे म्हणजेच पतीचे आयुष्य दीर्घाऊ रहावे, यासाठी महिला कपाळावर कुंकू लावत असतात.

विवाहित स्त्रीच्या माथ्यावर लावलेले चिमूटभर कुंकू तिच्या जीवनातील सुख समृद्धीचा परिचय करून देते. पतीच्या नावाने लावलेले कुंकू तिचे अखंड विवाहित असण्याची निशाणी दर्शवते. एका विवाहित स्त्रीसाठी सर्व सोळा शृंगारामधून कुंकू अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अनेक महिला कपाळभर कुंकू लावतात. मात्र आता या कुंकवाची जागा टिकलीने घेतली असली तरीही त्याचे महत्त्व कायम आहे. सण, उत्सव घरगुती कार्यक्रमात अजूनही कुंकवाचाच वापर केला जातो.

भारतीय संस्कृतीमध्ये विवाह हे केवळ दोन व्यक्तींमधील करार नसून तो दोन आत्म्यांचं, दोन कुटुंबांचं आणि दोन आयुष्यांचं पवित्र एकत्रीकरण मानलं जातं. या एकत्रीकरणामध्ये सिंदूर हा एक महत्त्वाचा घटक असतो. लग्नाच्या मंगलविधीमध्ये वर जेव्हा वधूच्या भांगात सिंदूर भरतो, तेव्हा तो क्षण केवळ धार्मिक नसून आध्यात्मिक आणि भावनिकदृष्ट्याही अत्यंत पवित्र असतो. तो क्षण स्त्रीच्या आयुष्यातील एक नवीन पर्व सुरू करतो, जिथे तिचे अस्तित्व एका नवीन नात्याशी जोडलं जातं.

भारतीय स्त्रीसाठी पती हा केवळ एक जीवनसाथी नाही, तर तो तिच्या जीवनात स्थिरता, सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठा देत असतो. एका मुलीला प्रथम वडिलांचे नाव मिळत असते आणि लग्नानंतर तिला तिच्या पतीच्या नावावरूनच पुढे आयुष्यभर स्त्री म्हणून नवीन ओळख मिळत असते. त्यामुळे भारतीय संस्कृतीमध्ये पतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

भारतीय संस्कृतीत पती-पत्नीचे नाते हे केवळ शारीरिक नसून आध्यात्मिक, भावनिक आणि सामाजिक ही महत्त्वाचे मानले जाते. पत्नी आपल्या पती सोबत मिळून कुटुंब व्यवस्था संभाळत असते, ज्यामुळे कुटुंबाला स्थिरता आणि आधार मिळत असतो. पत्नी ही फक्त एक सहचारीणी नसून ती पतीच्या सुख-दुःखात सहभागी होणारी, त्याच्या कुटुंबाची जबाबदारी घेणारी आणि प्रत्येक संकटात खंबीरपणे उभी राहणारी एक जीवनसाथी असते. स्त्री आपल्या पतीसाठी केवळ प्रेमानेच नव्हे, तर श्रद्धेने, निष्ठेने आणि समर्पणाने सिंदूर स्विकारत असते. सिंदूर हे तिच्या सौभाग्याचे चिन्ह आहे, त्यामुळेच विधवा झाल्यानंतर सिंदूर न लावण्याची परंपरा आजही काही समाजात पाळली जाते, कारण तिच्या आयुष्यातील तो भाग संपलेला असतो.

आजही ग्रामीण भागात आणि शहरी भागात अनेक स्त्रिया सिंदूर लावण्यास एक गौरव मानतात कारण तो तिच्या सन्मानाचे आणि अस्मितेचे चिन्ह बनलेले असते.

लग्नानंतर एका स्त्रीच्या आयुष्यातील अनेक गोष्टी बदलतात जसे नाव, घर, जबाबदाऱ्या, मातृत्त्व, स्वप्नं पण त्या सर्व बदलांसोबत ती सिंदूरलाही आपल्या अस्तित्वाचा भाग मानते.

असा हा लाल रंग आहे सिंदूराचा. भारतीय स्त्रीच्या आयुष्यात लाल रंग फक्त रंग म्हणून किंवा एक सौंदर्य प्रसाधन नसून तिच्या संपूर्ण अस्तित्वाचा एक अभिन्न घटक बनतो. लाल रंग आहे तिच्या स्वाभिमानाचा, तिच्या नात्याच्या बंधनाचा आणि तिच्या अंत:करणातील निखळ समर्पणाचा. चैत्रगौरी, वटपौर्णिमा, नागपंचमी, मंगळागौरी, सत्यनारायण, हरितालिका, ज्येष्ठ गौरी पूजन, नवरात्र, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी लक्ष्मीपूजन, मार्गशीर्ष गुरुवार व्रत, मकरसंक्रांत हे आणि असे अनेक स्त्रियांचे वर्षभरातील हळदीकुंकूचे महत्त्वाचे सण आहेत.

लाल रंग अत्यंत प्रभावी आणि लक्ष वेधून घेणारा असतो. लाल रंग हा फक्त रंग नाही, तर तो भारतीय परंपरेचा, श्रद्धेचा, नवसाच्या पूर्णत्वाचा आणि भावनांचा रंग आहे. देवतेच्या चरणी अर्पण करण्यात येणारा गुलाल असो किंवा व्रताच्या निमित्ताने कपाळावर लावलेला टिळा असो, वा नववधूच्या कपाळातील सिंदूर असो ! लाल रंगाची प्रतीके स्त्रीच्या सशक्ततेचे आणि सौभाग्याचे द्योतक असतात.

लाल रंगाला सौभाग्याचा, प्रेमचा, वचनबद्धतेचा, शक्तीचा, नवीन ऊर्जेचा, समर्पणाचा, शौर्याचा, समृद्धीचा, सातत्याचा आणि उत्साहाचा यांचे प्रतीक मानले जाते. लाल रंग तीव्र भावना आणि आवेशाचे प्रतिनिधित्व करत असून हा रंग प्रत्येक भारतीय स्त्रीच्या आयुष्यातील एक अनिवार्य भाग आहे.

आपल्या भारत देशाचा इतिहास पाहिला तर आपल्याला दिसते की प्राचीन काळात देखील सिंदूर लावण्याची परंपरा होती. राजा-महाराजांच्या काळात स्त्रिया सिंदूराला अत्यंत महत्व द्यायच्या कारण तो तिच्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी, सौख्यासाठी आणि सौभाग्यासाठी लावला जात असे. सिंदूर लावणं म्हणजे केवळ परंपरा पाळणं नाही, तर आपल्या नात्यांची जबाबदारीही स्विकारणं असतं.

पहलगाममध्ये गमावलेल्या निष्पाप जीवांसाठी न्यायाचे प्रतीकात्मक रूप म्हणून या ऑपरेशनला 'सिंदूर' असे नाव देऊन भारत सरकारने इतर देशांना एक मजबूत संदेश देण्याचा मानस केला. हा पहलगाममध्ये गमावलेल्या निष्पाप हिंदू जीवांसाठी न्यायाचे प्रतीकात्मक रूप होते आणि याला प्रामाणिकपणे साथ दिली ती आपल्या भारतमातेच्या वीर जवानांनी. आपल्या भारत देशाच्या सीमेवर लढणाऱ्या प्रत्येक जवानांनी स्वतःच्या परिवाराचे 'सिंदूर' पणाला लावून हे 'सिंदूर ऑपरेशन' मोठ्या धैर्याने व मातृभूमीच्या प्रेमापोटी आपल्या प्राणाची पर्वा न करता मोठ्या मनाने पूर्णत्वास नेले आहे. 'सिंदूर' हे नाव संरक्षण, सन्मान आणि पीडितांना श्रद्धांजली वाहण्याचे प्रतिनिधित्व करते. हे भारताच्या नागरिकांचे आणि मूल्यांचे रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचे देखील प्रतिबिंबित करते.

"मी जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहे. पैशाच्या बाबतीत नाही तर कोट्यवधी माता, बहिणी आणि मुलींचे आशीर्वाद ही माझी सर्वात मोठी ताकद, भांडवल आणि संरक्षणात्मक ढाल आहेत," असे आपल्या भारत देशाचे पंतप्रधान मा. मोदीजी म्हणतात. त्यांनी अशाप्रकारे आपली सर्व विधाने सत्यात उतरवली आहे. या पावन भारत भूमीवर राहणाऱ्या सर्व जनतेला ते आपल्या स्वतःच्या मुलांप्रमाणे प्रेमाने जपतात हे आपल्याला 'ऑपरेशन सिंदूर' या मधून दिसून येते.

असा हा लाल रंग भारतीय संस्कृतची आन-बान-शान म्हणजेच आत्म-सम्मान, वेशभूषा आणि प्रतिष्ठापूर्ण ओळख आहे. असा हा लाल रंग अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे आणि तो आपल्या सर्व भारतीयांच्या जीवनातील विविध पैलूंसोबत सदैव जोडलेला असतो. असा आहे हा 'सिंदूर'...

## थोडक्यात



### डिवाइन जैन ग्रुप यांच्या पुढाकारातून सामाजिक उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : समाजातील जेष्ठ तसेच दिव्यांग व्यक्तींनी सुरक्षिततेने रेल्वे प्रवास करता यावा या हेतूने समाजउपयोगी उपक्रमांतर्गत पुण्यातील डिवाइन जैन ग्रुप व प्रायोजकांच्या संयुक्त विद्यमाने पुणे रेल्वे स्थानक येथे 10 व्हीलचेअर्स वितरण करण्यात आले. हा व्हीलचेअर्स आवश्यक प्रवाशांना प्रवासादरम्यान होणाऱ्या गैरसोयीपासून नक्कीच मदत करेल व असे ५० व्हीलचेअर्स विविध रेल्वे स्थानकांवर, रुग्णालयांमध्ये आणि आवश्यक ठिकाणी वितरित केल्या जातील असे डिवाइन जैन ग्रुप ट्रस्टचे अध्यक्ष संकेत शहा यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. अनिलकुमार पाठक (वरिष्ठ मंडल वाणिज्य प्रबंधक, पुणे मंडल) यांच्या हस्ते संपन्न झाले. तसेच व्हीलचेअर्स देणाऱ्या हिंदुस्तान मेटल्स अँड इलेक्ट्रॉनिक कंपनी, जयराज ग्रुप, ज्यूली बँग, YMI घरसोप प्राइवेट लिमिटेड, वर्मा कुटुंब, व अनेक दात्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी संजयकुमार (पुणे स्टेशन डायरेक्टर), हेमंत बेहेरा (रेल्वे अधिकारी), यशपाल राजेंद्र नागोरी, उत्तम धोका, वीर धोका, अभिजीत शहा, हार्दिक शहा, चेतन जैन, प्रियांका शहा, श्रीमती मधु नागोरी, किंजन नागोरी, यांशी नागोरी, किनिशा नागोरी, राहुल कोठारी, मयूर सरनोत, राजाभाऊ भुजबळ व अन्य रेल्वे कर्मचारी व डिवाईन जैन ग्रुप ट्रस्टचे सदस्य उपस्थित होते.

### पर्यावरण दिनी आईच्या स्मरणार्थ वृक्षरोपण !



खडकवासला (आरंभ पर्व) : पश्चिम हवेली भाजपा अध्यक्ष, खडकवासला ग्रामीण मंडल अध्यक्ष श्री.नवनाथ तागुंदे पाटील यांनी आईच्या स्मरणार्थ वृक्षारोपण केले. खडकवाडी येथे पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षरोपण केले. सामाजिक राजकीय क्षेत्रात असूनही पर्यावरणाविषयी असलेला जिव्हाळा या निमित्त दिसून येत आहे. तागुंदे यांनी खडकवाडी व परिसरामध्ये विविध प्रकारचे अनेक वृक्ष लावले असून त्याचे संवर्धनही करत आहेत.

### ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने वृक्षारोपण

वारजे (आरंभ पर्व) : जागतिक पर्यावरण दिननिमित्त जेष्ठ नागरिक संघ शिवणे परिसर अध्यक्ष श्रीराम कुलकर्णी व राजू पाटील फाउंडेशनच्या वतीने वारजे गणपती माथा वनिकरण जागेत सामूहिक वृक्षारोपण* करण्यात आले. भाजप नेते अरुणभाऊ दांगट, मा.सरपंच सुभाष नाणेकर, मा सरपंच उमेश सरपाटील शिवणे परिसरातील जेष्ठ नागरिक राजकीय, पदाधिकारी, पत्रकार बांधव इतर मान्यवर उपस्थित होते. झाडे ही मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन देतात त्यासाठी झाडे लावणे ही पुण्याची गोष्ट आहे. सर्वांनी वृक्षरोपण करणे हीच खरी गरज असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

### गुलाब कोंडीबा दुंडे यांचे दु:खद निधन



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी काळभोर येथील प्रगतिशील शेतकरी गुलाब कोंडीबा दुंडे (वय ८०) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली,सुन,नातवंडे व जावई असा परिवार आहे .ते परिसरात आप्पा या नावाने ओळखले जायचे श्री काळभैरव अंबरनाथ सर्व देवस्थान ट्रस्ट सदस्य होते .पत्रकार चंद्रकांत दुंडे यांचे ते वडील होते .







# रुपेश घुले पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## कार्यकर्त्यांकडून नगरसेवक पदासाठी पाठिंबा!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भाजपचे धायरी-शिवणे मंडल अध्यक्ष, रुपेश घुले पाटील यांचा वाढदिवस नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्याला मान्यवरांनी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती, त्यांना शुभेच्छा देण्यासाठी अनेक जण उपस्थित होते. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ, चंद्रकांतदादा पाटील, खडकवासल्याचे आमदार भीमराव अण्णा तापकीर आणि भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी दूरध्वनीद्वारे रुपेश घुले पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

**विविध कार्यक्रमांचे आयोजन आणि सामाजिक उपक्रम**

वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्याला चांगला प्रतिसाद मिळाला. 'साहित्य संगीत व कला सेवा समिती'तर्फे गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याशिवाय, वृद्धाश्रमांमध्ये अन्नदान करण्यात आले आणि पर्यावरणाला पोषक म्हणून वृक्षवाटपही करण्यात आले. दिवसभर रुपेश घुले पाटील यांनी कार्यकर्ते आणि नेत्यांकडून शुभेच्छा स्वीकारल्या. यावेळी उत्साही कार्यकर्त्यांनी 'नगरसेवक' नावाचा केक कापून आगामी महानगरपालिका निवडणुकीत रुपेश घुले पाटील हे निश्चितपणे नगरसेवक होणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

**दैनिक आरंभपर्व तर्फे रुपेश घुले पाटील यांना विशेषांक देताना निवासी संपादक लक्ष्मण साबळे**





**रुपेश घुले पाटील यांची कृतज्ञता आणि संकल्प**

वाढदिवसानिमित्त बोलताना रुपेश घुले पाटील यांनी शुभेच्छा देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आणि मान्यवरांचे आभार मानले. ते म्हणाले, "जनसेवेला प्राधान्य देऊन मी आजपर्यंत काम करत आलो आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी स्वीकारून काम केल्यामुळेच मला ही संधी मिळाली आहे."

ते पुढे म्हणाले, "भागाच्या विकासाला प्राधान्य देऊन आगामी काळातही मी कार्यरत राहणार आहे. भागातून पक्षाचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याचा माझा प्रयत्न राहील. जनतेचे खूप प्रेम मिळाले आहे आणि त्यांच्यासाठी खूप काही करायचे आहे, हाच माझा संकल्प आहे."

**उपस्थित मान्यवर :** यावेळी खडकवासला मतदारसंघाचे भाजपाध्यक्ष सचिन मोरे, सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, हेमेंद्र जोशी, सचिन दांगट, सुजित कारले, महेश बजाज, रुपेश घुले पाटील यांच्या पत्नी आणि खडकवासला भाजप महिला मोर्चा अध्यक्षा रश्मी घुले पाटील, वेंकटसाई होंडाचे संतोष कदम, प्रल्हादराव जाधव पाटील, अजित कारले, हेमेंद्र जोशी, वर्धमान भालेराव, शिंदे सर, गंधे सर, ब्रह्माकुमारी ललिता दीदी, सौ. वृषालीताई शेकदार, सुप्रियाताई करमरकर, विजय शेकदार, विशाल कदम, संस्कार फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा उमा राय यांच्यासह विविध मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी रुपेश घुले पाटील यांना 'जनतेच्या मनातील नगरसेवक' असे संबोधत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कारले चौकातील सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचे उद्‌घाटन

**आ. भीमराव तापकीर यांच्या विकास निधीतून ३० लाख रुपये निधी मंजूर**



**नांदेड (दै. आरंभ पर्व)**

नांदेड सिटी येथील सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचे उद्‌घाटन करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याच्या मागणी नागरिकांकडून केली जात होती. खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर त्यांच्या विकास निधीतून तीस लाख रुपये नुकतेच मंजूर झाले होते.

ह्या कामासाठी खडकवासला भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील, भाजपा सरचिटणीस सुजित कारले यांनी पाठपुरावा केला त्यास यश आले.

अखेर सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी खडकवासला भाजपा मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील, भाजपा युवा सरचिटणीस सुजित कारले, दामोदर आण्णा देडगे, तुकाराम तात्या दारवटकर ,हेमेंद्रजी जोशी, महेशजी बजाज,अजित कारले,विशाल शेठ कदम,जीवन देडगे विकास शेठ पायगुडे अभिषेकश देडगे, सुरज दारवटकर, शिवाजी देडगे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

या रस्त्याच्या कामाबद्दल नागरिकांनी आनंद व्यक्त केला. गेल्या अनेक वर्षापासूनचा एक प्रलंबित प्रश्न या निमित्त सुटला गेला आहे. यावेळी बोलताना भाजपा अध्यक्ष रुपेश घुले यांनी आ. भीमराव तापकीर यांचे आभार मानले. नांदेड करांच्या विकासासाठी आगामी काळातील विविध विकास कामे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनच्यावतीने जागतिक रक्तदान दिन व जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

दिनांक ८जून२०२५ रोजी ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशन संचलित ऊरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुप यांच्या वतीने जागतिक रक्तदान दिन आणि जागतिक पर्यावरण दिन संयुक्तरित्या मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. जयंत खडसे (व्हाईस प्रेसीडेंट,बायफ), सुरेश वरक(वनपरिक्षेत्र अधिकारी, हवेली, पुणे) प्रा. के. डी. कांचन(उपाध्यक्ष,महात्मा गांधी सर्वोदय संघ) मयुर कांचन(सरपंच, उरुळी कांचन), सौ. स्वप्नीषा कांचन (उपसरपंच, उरुळी कांचन) प्रमोद रासकर, (वनपरिक्षेत्र अधिकारी) तसेच राजाराम कांचन, महादेव कांचन, जे.बी. बेदरे, अमित कांचन ,संतोष कांचन , भाऊसाहेब कांचन, युवराज कांचन, राजेंद्र टिळेकर ,टिळेकर वाडीचे पोलीस पाटील विजय टिळेकर ,सुभाष टिळेकर आदी मान्यवर उपस्थित होते .



उद्‌घाटन प्रसंगी बोलत असताना सुरेश वरक यांनी ऊरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपची संघटन शक्ती, कामातील सातत्य आणि चिकाटी याबद्दल कौतुक केले.

त्याचबरोबर वन क्षेत्रात वृक्ष लागवड आणि संवर्धन कार्यासाठी आवश्यक ती पूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख पाहुणे मा.श्री. डॉ.जयंत खडसे यांनी मागील १०वर्षात फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेले ग्राम स्वच्छता अभियान आणि जनजागृती याची दखल घेत भविष्यात उरुळी कांचन गावातील घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणीसाठी भागीदार म्हणून सहभागी होवू तसेच कचरामुक्त ऊरुळी कांचन करण्यासाठी बायफ एक संस्था म्हणून तंत्रज्ञान विषयक सहकार्य करेल असे मत यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. के.डी. कांचन यांनी कचरा मुक्त उरुळी कांचन या संकल्पनेला पूर्ण पाठींबा देत देवस्थान ट्रस्ट, उरुळी कांचन यांच्यावतीने या नियोजित प्रकल्प उभारणीसाठी २एकर जागा उपलब्ध करुन देवू असे मत मांडले.

या प्रसंगी उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिंदवणे घाट परिसरामध्ये ४००० वृक्ष लागवड कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

त्याचबरोबर बी. जी. शिर्के बालविकास मंदिर येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिरामध्ये एकूण ७६८रक्तदात्यांनी रक्तदान केले, त्यापैकी २१ महीला रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरासाठी तर्पण ब्लड बँक, ससून रक्त पेढी, स्पंदन ब्लड बँक आणि महा ब्लड बँक यांनी सहभाग नोंदवला.

शिबीराचे विशेष आकर्षण म्हणजे दात्री सेवाभावी संस्थेच्या वतीने रक्तच्या कर्क रोगावरील उपचारासाठी रक्तपेंशीची जुळणी करण्यासाठी स्वॅब चाचणी शिबीर राबविले. दात्री ही आंतरराष्ट्रिय पातळीवर रक्ताचा कर्करोगाप्रती जनजागृती आणि शिबीरांचे आयोजन करणारी भारतातील अग्रणी संस्था आहे. या शिबीरात २६५रक्तदात्यांनी स्वॅब दिले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन ग्रामदुत ऋषिकेश भालेराव, प्रास्ताविक ग्रामदुत गणेश कोलते आणि आभार ग्रामदुत स्वरुप झाडगे यांनी व्यक्त केले.

यावेळी मयूर लोंढे यांनी ५० वेळा तर प्राध्यापक शेखर शिंदे यांनी २४ वेळा रक्तदान केल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.

# नऱ्हेतील वाहतूक कोंडी असह्य

## नागरिक संतप्त, प्रशासनाच्या उपाययोजनांची प्रतीक्षा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेत समावेश होऊनही नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या काही केल्या सुटत नसल्याने नागरिक प्रचंड संतप्त झाले आहेत. समाविष्ट गावांपैकी एक महत्त्वाचे आणि रहदारीचे गाव असलेल्या नऱ्हेमध्ये वाढलेल्या लोकसंख्येमुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. याचा परिणाम म्हणून सकाळी आणि सायंकाळी ६ नंतर परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होते.



गंधर्व चौक, मानाजी नगर, पारे चौक, भुमकर चौक यांसारख्या ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते, ज्यामुळे नोकरदार, विद्यार्थी आणि इतर नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. वाहनांची संख्या वाढली असली तरी, रस्त्यांवरील अतिक्रमणे, अडथळे निर्माण करणारे लाईट पोल, फेरीवाले आणि विक्रेते यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

अनेक नागरिकांनी पुणे महानगरपालिकेकडे जाऊनही आपल्या समस्या सुटत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आगामी काळात पुणे महानगरपालिका आणि वाहतूक विभाग यासंबंधी काही उपाययोजना करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मागील महिन्यात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. सौ. रुपालीताई चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली वाहतूक कोंडीसंदर्भात एक बैठक झाली होती. या बैठकीत नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीबाबत वाहतूक पोलीस उपायुक्त मा. श्री. मनोज पाटील, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्री. अनिरुद्ध पावसकर आणि इतर संबंधित सर्व अधिकारी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी यावेळी नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीचा विषय मांडला होता आणि त्यावर लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही.

या भागात अनेक शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक क्षेत्रांचे मोठे जाळे असल्यामुळे सर्वांनाच या वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. ही वाहतूक समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी या भागातील प्रवासी आणि नागरिकांनी केली आहे.



**नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीबाबत मागील मीटिंगमध्ये विषय मांडले होते. मानाजीनगर नऱ्हे येथील ग्रीनलँड काउंटर समोरील रस्ता हा फक्त दुचाकीसाठी वापरण्याकरता त्याला स्टील राऊंडर लावण्यात यावे. गंधर्व चौकातील पारी चौकाकडून येणारा रस्ता चाकणकर कॉर्नर येथे अरुंद करून वाहने वळण्याच्या योग्य करण्यात यावी.लवकरात लवकर नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीबाबत ठोस पावले उचलली जावीत अन्यथा नऱ्हेकरांच्या वतीने आंदोलन केले जाईल.**

**- भूपेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते**



## थोडक्यात



### आदित्य बिर्ला ज्वेलरी ब्रँड इंद्रियाकडून पुण्यामध्ये तिसरे स्टोअर लाँच

पुणे (आरंभ पर्व) : आदित्य बिर्ला ज्वेलरी ब्रँड इंद्रियाने पुण्यातील औंध येथे तिसऱ्या स्टोअरच्या लाँचसह महाराष्ट्रातील आपले विस्तारीकरण सुरू ठेवले आहे. गेल्या वर्षी बंड गार्डन आणि पिंपरी येथे यशस्वी पदार्पणांनंतर या नवीन उद्घाटन करण्यात आलेल्या स्टोअरमधून महाराष्ट्रातील सूक्ष्मदर्शी व वैविध्यपूर्ण ज्वेलरी ग्राहकांप्रती ब्रँडची सखोल कटिबद्धता दिसून येते. यासह इंद्रियाचे राज्यभरात सहा स्टोअर्स कार्यरत आहेत. उदयास येत असलेले आर्थिक हब आणि संपन्न ज्वेलरी बाजारपेठ पुणे इंद्रियाला अधिकाधिक ग्राहकांशी संलग्न होण्याची लक्षवेधक संधी देते. या शहराचा संपन्न महाराष्ट्रीयन वारसा, तसेच उत्साहीपणा, आधुनिकता या शहराला कालातीत कारागिरी व आकर्षक डिझाइन असलेले दागिने दाखवण्यासाठी योग्य गंतव्य बनवते. आकर्षक सोने, हिरे व पोल्की डिझाइन्ससह पुण्यातील ज्वेलरी बाजारपेठेत पारंपारिक आणि समकालीन आकर्षकतेचे सुरेख संयोजन आहे. पारंपारिक व आधुनिक आकर्षकतेचे कौतुक करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातील ज्वेलरी बाजारपेठ इंद्रियाच्या मुलभूत तत्त्वाशी संलग्न आहे. 20,000 हून अधिक दागिन्यांचे क्यूरेटेड कलेक्शन आणि सोने, हिरे व पोल्कीमधील 5,000 हून अधिक विशेष डिझाइन्ससह इंद्रिया प्रत्येक आवड, प्रसंग व स्टाइलसाठी आभूषण देते, ज्यामुळे प्रत्येकासाठी हे योग्य गंतव्य आहे. 2024 मध्ये लाँच झाल्यापासून इंद्रियाने भारतभरात स्थिर प्रगती केली आहे. नवीन लाँचसह इंद्रिया आता देशभरात 24 स्टोअर्ससह कार्यरत आहे. यापैकी दिल्लीमध्ये पाच स्टोअर्स, मुंबई, हैदराबाद व पुणे येथे प्रत्येकी तीन स्टोअर्स, अहमदाबाद, जयूपर व पटणामध्ये प्रत्येकी दोन स्टोअर्स आणि इंदौर, सुरत, आंध्रप्रदेश व उत्तरप्रदेशमध्ये प्रत्येकी एक स्टोअर आहे. यासह ब्रँडची उत्तर, दक्षिण व पश्चिम भारतात प्रबळ उपस्थिती आहे. इंद्रियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप कोहली म्हणाले, आज ज्वेलरी स्वयं-अभिव्यक्तीचे प्रबळ माध्यम आहे, जेथे वारसा व आधुनिक डिझाइनचे संयोजन होते आणि कारागिरीमधून वैयक्तिक गाथा सांगितली जाते. इंद्रियामध्ये आम्ही नेहमी संस्कृतीमध्ये रूजलेली आणि सर्जनशीलरित्या विशिष्ट असलेली ज्वेलरी निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

### खरीप हंगामासाठी विविध प्रकारचे बियाणे उपलब्ध

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : येथील खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ यांच्या वतीने खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना आवश्यक असणारे विविध प्रकारचे बियाणे व खते माफक तसेच सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत, अशी माहिती संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित पुणे यांच्याकडील दर्जेदार इंद्रायणी भात, किमया, संगम फुले, जातीचे सोयाबीन बियाणे, कांदा बियाणे विक्रीसाठी संघाच्या खेड येथील कार्यालयात उपलब्ध झालेले आहे. बियाणे साठा मर्यादीत उपलब्ध असून सद्यपरिस्थितीत पाऊस समाधानकारक झालेला असला तरी देखील कृषी खात्याचा सल्ला घेवूनच शेतकऱ्यांनी पेरणी करण्याचा निर्णय घ्यावा, संघामध्ये सर्व प्रकारची रासायनिक खते व मिश्रखत खते विक्रीस उपलब्ध असल्याची माहिती खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय टेमगिरे यांनी दिली. खरीप हंगामामध्ये खास तालुक्यातील शेतकऱ्यांना माफक दरात युरीया बफर्स स्टॉकमधून विना लिंकिंग मिळण्यासाठी खेड तालुक्याचे आमदार बाबाजी काळे यांनी ADO व अधिक्षक कृषी विस्तार अधिकारी यांचेकडे मागणी शिफारस केली आहे. त्यामुळे जून, जुलै, ऑगस्ट या कालावधीसाठी युरिया खते उपलब्ध होतील; तरी बियाणे व खते खरेदी करण्यासाठी येताना सोबत ७/१२, ८ अ, आधार कार्ड घेऊन येणे गरजेचे आहे. असे आवाहन खरेदी विक्री संघाचे सचिव भास्कर जगदाळे यांनी केले आहे.

### लता व शशांक हगवणेंसह चार आरोपींना न्यायालयीन कोठडी

- जेसीबी मशीन फसवणूक प्रकरण

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : जेसीबी मशीन गैरव्यवहार प्रकरणी शशांक हगवणे व लता हगवणे या मायलेकासह तीन तोतया बँक वसुली एजंट आणि जेसीबी मशीन शशांक हगवणे याच्या ताब्यात देणारा त्याचा मित्र प्रणय साठे अशा सहा जणांवर महाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्वांना एक दिवसाच्या पोलीस कोठडीनंतर शनिवारी (दि.७) राजगुरूनगर न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाकडून या सर्वांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.जेसीबी फसवणूक प्रकरणात प्रशांत येळवंडे यांनी महाळुंगे एमआयडीसी (ता.खेड) पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीवरून शशांक आणि लता हगवणे या मायलेकासह योगेश राजेंद्र रासकर, गणेश रमेश पोतले, वैभव मोहन पिंगळे ह्या तीन तोतया बँक अधिकाऱ्यांसह तडजोड करणारा प्रणय साठे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शशांक आणि लता हगवणे व इतर चार जणांची पोलिस कोठडी संपल्यानंतर शनिवारी (दि.७) ला राजगुरूनगर न्यायालयात हजर करण्यात आले होते, सर्वांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. यावेळी तपासी अधिकाऱ्यांनी तीन दिवसांच्या वाढीव पोलिस कोठडीची मागणी केली होती, मात्र न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेऊन न्यायायलीन कोठडी सुनावली. त्यामुळे आता हगवणे माय लेकांसह इतर चार जणांची येरवडा कारागृहात रवानगी होणार आहे. शशांक आणि लता हगवणे यांच्या जामिनासाठी प्रकिया सुरू केली असल्याची माहिती त्यांचे वकिल ॲड. स्वानंद गोविंदवार यांनी दिली.

# धायरीमध्ये ड्रेनेज लाईनचे काम तात्काळ सुरू

## बापूसाहेब पोकळेंच्या प्रयत्नांना यश







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी गावातील लायगुडे वस्ती आणि साईधाम परिसरातील सोसायट्यांमध्ये गेली दोन-तीन वर्षांपासून ड्रेनेज चोकअप होणे, रस्त्यावर पाणी साचणे आणि सोसायटीच्या पार्किंगमध्ये पाणी शिरणे यांसारख्या समस्यांनी नागरिक त्रस्त होते. या गंभीर समस्येवर सामाजिक कार्यकर्ते आणि भारतीय जनता पार्टी खडकवासला सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी तातडीने लक्ष देत, अवघ्या चार-पाच दिवसांत या कामाला सुरुवात करून घेतली आहे.

परिसरातील नागरिकांनी चार-पाच दिवसांपूर्वी बापूसाहेब पोकळे यांच्याकडे या समस्येबाबत तक्रार केली होती. समस्येचे गांभीर्य लक्षात घेता, बापूसाहेब पोकळे यांनी तात्काळ महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यांनी जुनी, कमी व्यासाची आणि जीर्ण झालेली ड्रेनेज लाईन काढून त्याऐवजी मोठ्या व्यासाची नवीन लाईन तात्काळ टाकण्यात यावी अशी आग्रही मागणी केली. बापूसाहेब पोकळेंच्या आग्रही मागणीनंतर आणि समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ पावले उचलली. पुणे महानगरपालिकेच्या विशेष निधीतून आजपासून या ड्रेनेज लाईनच्या कामाला सुरुवात झाली आहे. जनतेसाठी नेहमीच हिरारीने प्रत्येक कार्यात भाग घेणाऱ्या पोकळे यांनी अत्यंत वक्तशीरपणे हे काम मार्गी लावले आणि त्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून निधीही मंजूर करून घेतला.

हे ड्रेनेज लाईनचे काम 'एस ए इन्फ्रा' या ठेकेदाराद्वारे केले जात आहे. सुमारे ४५० ते ५०० मीटर लांबीची ही लाईन टाकली जाणार असून, या पावसाळी लाईनचा फायदा जवळपास २० ते २५ सोसायट्यांना होणार आहे. त्यामुळे रस्त्यावर होणारे ड्रेनेज आणि पाणी साचण्याचा प्रश्न बऱ्याच अंशी सुटण्यास मदत होणार आहे. या कामाला सुरुवात झाल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी बापूसाहेब पोकळे आणि पुणे महानगरपालिकेचे आभार मानले आहेत.

या कामामुळे धायरी परिसरातील नागरिकांना पावसाळ्यात होणाऱ्या त्रासातून मोठा दिलासा मिळणार आहे.

### नागरिकांच्या समस्यांसाठी तत्परता हेच कर्तव्य : बापूसाहेब पोकळे

**श्री. बापूसाहेब पोकळे, सरचिटणीस खडकवासला भाजपा यांनी यावेळी बोलताना सांगितले, "या परिसरातील नागरिकांनी रस्त्यावरून वाहणाऱ्या ड्रेनेजबाबत माझ्याकडे तक्रार केली. मी तात्काळ पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. प्रत्यक्ष घटनास्थळी त्यांना बोलावून परिस्थितीची माहिती दिली आणि जुनी लाईन काढून नवीन लाईन टाकण्याची सूचना केली. अधिकाऱ्यांनीही हे काम मनावर घेऊन तात्काळ कार्यवाही केली आणि आज अखेर कामाला सुरुवात झाली आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी तत्परता दाखवणे हेच मी माझे कर्तव्य समजतो. आगामी काळातही विकास कामांसाठी मी कटिबद्ध राहणार आहे."**

### शक्य तितक्या लवकर काम पूर्ण करणार : सिद्धाराम पाटील

**सिद्धाराम पाटील, कनिष्ठ अभियंता, पुणे मनपा यांनी सांगितले की, "अस्ताव्यस्त वाहणाऱ्या पाण्याबाबत या भागातून वारंवार तक्रारी येत होत्या. श्री. बापूसाहेब पोकळे यांच्यासोबत आम्ही पाहणी केल्यानंतर नवीन लाईन टाकण्याचे निश्चित करण्यात आले. या कामास सुरुवात केली आहे आणि शक्य तितक्या लवकर हे काम पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे."**

# इंदिरा पाझर तलावाच्या पाण्यात सोडले हॉटेलचे सांडपाणी

## पाच गावच्या ग्रामस्थांना आरोग्याला धोका



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

**किरण खुडे**

सांडभोरवाडी-तिन्हेवाडी (ता.खेड) परिसरात असलेल्या इंदिरा पाझर तलावात एका हॉटेल व्यावसाईकाने खड्डयात साठवलेले सांडपाणी सोडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. यामुळे तलावातील पाणी दूषित होऊन नागरिकांच्या व जनावरांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. पुणे नाशिक महामार्गावर खेड घाट ओलांडल्यानंतर एक हॉटेल आहे. हॉटेलव्यावसाईकाने शोषखड्डा करून सांडपाणी साठवलेला खड्डा जेसीबी यंत्राने फोडला. डोंगर उताराने हे पाणी ओढ्याच्या पात्राद्वारे थेट तलावाच्या पाण्यात आले. खेड तालुक्यातील सांडभोरवाडी, तिन्हेवाडीसह जैदवाडी, वरची भांबुरवाडी, तुकाईवाडी आणि आंबेगाव तालुक्यातील पेठ अशा पाच गावांच्या पाणी पुरवठा योजना या पाण्यावर अवलंबुन आहेत. हॉटेल चालकाच्या कृत्यामुळे खेड आणि आंबेगाव तालुक्यातील पाच गावांच्या नागरिकांच्या आरोग्याला इजा पोहचण्याची भीती यामुळे व्यक्त होत आहे.हे पाणी पिण्यासाठी वापरले जाते. असे पाणी पिल्यास जुलाब-उलट्या, साथीच्या आजारांचा त्रास ग्रामस्थांना होऊ शकतो, असे आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले. सबंधित हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांसाठी बनवले जाणारे नाश्ता, जेवण त्यातील धुणी भांडी, स्वच्छता गृहाचे मलमूत्र असे सर्व घाण व दुषित पाणी हॉटेलच्या मागील बाजूस जमिनीत मोठा शोषखड्डा करून साठवले जाते. उतारावर असलेल्या या खड्डयातून पावसाळा सुरू झाला की सांडपाणी सोयीस्कर पद्धतीने ओढ्यात सोडले जाते. असा काही स्थानिक नागरीकांचा आरोप आहे.

# शुभंकरने जिंकला ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचा रियल मी हिप हॉप इंडियाचा दुसरा सीझन

**मुंबई, भारत (दै. आरंभ पर्व)**



विजेतेपदाची लढाई उत्सुकतेच्या शीगेला पोहोचली असतानाच शुभंकर उर्फ हेक्टिक ॲमेझॉनची मोफत स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवरील रियलमी हिप हॉप इंडिया सीझन 2 चा विजेता ठरला. रेमो डिसूझा आणि मलाईका अरोरा परीक्षक असलेला हा सीझन खऱ्या अर्थाने जिद्द, व्यक्तीमत्त्व आणि हिप हॉपची धमाल साजरी करणारा ठरला. वाढत्या लोकप्रियतेमुळे प्रत्येक आठवड्यात हा शो सर्वाधिक पाहिल्या जाणाऱ्या स्ट्रीमिंग ओरिजनल्सपैकी एक होता. थरारक फेस ऑफ, नवी गुणवत्ता आणि अनपेक्षित ट्विस्ट्स यामुळे या शो ला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद लाभला. मेट्रो.. इन दिनो या आगामी सिनेमातील सारा अली खान, आदित्य रॉय कपूर या कलाकारांनी हजेरी लावल्यामुळे अंतिम फेरीने कळस गाठला. या कलाकारांनी अंतिम फेरीत उपस्थित राहून चॅम्पियन्सना प्रोत्साहन दिले आणि 4 जुलै 2025 रोजी प्रदर्शित होणार असलेल्या या सिनेमाचे प्रमोशन केले.

जोश आणि कलात्मकतेने परिपूर्ण असलेल्या या अंतिम फेरीत शुभंकरने हितेश, रूल ब्रेकर्झ, अमन- कुणाल आणि लिल पुल यासारख्या आपली शैली खुबीने सादर करणाऱ्या स्पर्धकांना मागे टाकले. जबरदस्त उर्जा आणि क्रम्प स्टाइलवर असलेल्या मक्तेदारीनं शुभंकर यांनी स्टेजवर वर्चस्व गाजवले. ट्रॉफी मिळवल्यानंतर आता शुभंकर यांना डान्स स्टेजच्या पलीकडे जायचे आहे. क्रम्पचा प्रसार करण्यासाठी त्यांनी रिॲलिटी शोजपासून सिनेमा, थिएटर, वेब सीरीजमध्ये अभिनय करण्याचे व या अमर्यादित असलेल्या कलेचे कौशल्य सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे ध्येय ठेवले आहे.

विजेतेपद मिळवल्यानंतर शुभंकर म्हणाले,'हिप हॉप इंडिया सीझन 2 असामान्य होता आणि मी तो कधीच विसरणार नाही. संपूर्ण शोदरम्यान रेमो सर व मलाईका मॅम यांनी केलेलं मार्गदर्शन माझ्यासाठी खूप खास राहील. क्रम्पने मला विशिष्ट उद्देशासह नृत्य करणं व शब्दांशिवाय बोलणं शिकवलं. माझं कौशल्य लक्षात घेणाऱ्या प्रत्येकाचा मी कृतज्ञ राहीन. क्रम्प स्टाइल नव्या उंचीवर नेण्याची वेळ आली आहे.'

शुभंकरच्या प्रवासाचे कौतुक करताना जज रेमो डिसूझा म्हणाले, 'शुभंकरनं स्टेजवर नवी भाषा आणली. त्याचं क्रम्प सादरीकरण अफलातून आणि खरं सांगायचं, तर मनापासून केलेलं व अविस्मरणीय होतं. हिप हॉप असंच असतं – आपलं अस्तित्व कलेच ओतणं. दर आठवड्यागणिक त्याचा परफॉर्मन्स आणखी उत्तम होत गेला आणि आज त्यानं सगळ्या देशासमोर स्वतःला सिद्ध केलं.'

जज मलाईका अरोरा म्हणाल्या, 'सुरुवातीपासूनच शुभंकरमध्ये जबरदस्त उर्जा होती, जिच्याकडे दुर्लक्ष करणं शक्य नव्हतं. त्याची स्टाइल, अस्तित्व आणि क्रम्पसाठी असलेली बांधिलकी यामुळे प्रत्येक परफॉर्मन्स खास ठरला. त्यानं फक्त परफॉर्म नाही केलं, तर प्रत्येक वेळेस त्यानं जणू एक गोष्ट सांगितली आणि सर्वांना जादुई क्षणांची अनुभूती दिली. एक कलाकार म्हणून त्याला विकसित होताना पाहाणं प्रेरणादायी होतं आणि त्याच्यासाठी ही तर फक्त सुरुवात आहे.'

आदित्य रॉय कपूर म्हणाले, 'भारतीय हिप हॉप किती पुढे गेलं आहे, याची अनोखी झलक रियलमी हिप हॉप इंडिया सीझन 2 मध्ये पाहायला मिळाली. या फिनालेमध्ये सहभागी होणं आणि खरा विजेता पाहाणं एक जबरदस्त अनुभव होता.'

सारा अली खान म्हणाल्या, 'रियलमी हिप हॉप इंडिया सीझन 2 च्या फिनालेमधली उर्जा काही वेगळीच होती. प्रत्येक कलाकाराचं सादरणीकरण सर्वोत्तम होतं. त्यांचं धाडस आणि स्वतःला इतक्या ठळकपणे व्यक्त करण्याची क्षमता पाहून मी थक्क झाले आहे. शुभंकरचे आणि या शोचा अजून एक यशस्वी सीझनसादर केल्याबद्दल ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे अभिनंदन.'

रियलमी हिप हॉप इंडिया सीझन 2 चा संपूर्ण सीझन ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर उपलब्ध असून त्याचबरोबर तो ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि कनेक्टेड टीव्हीवर पाहायला मिळेल.

# पत्रकार कुटुंबांना वैद्यकीय खर्चात ५०% सवलत : ऐतिहासिक निर्णय!



### प्रा. सचिन महाराज माथेफोड यांचा अभिप्राय

**पुणे जिल्हाध्यक्ष, राज्य मराठी पत्रकार परिषद, प्रा. सचिन महाराज माथेफोड यांनी या निर्णयाबद्दल बोलताना सांगितले की, "लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जाणारा पत्रकार, जो समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे काम करतो, तो आर्थिक बाबतीत नेहमीच मागे असतो. समाजाच्या हक्कासाठी लढणारा हा पत्रकार कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमध्ये अनेकदा कमी पडतो. त्यात स्वतःसाठी किंवा कुटुंबासाठी वैद्यकीय गरज पडल्यास, नेहमी इतरांच्या उपयोगी पडणाऱ्या पत्रकारांना मात्र निराशाच हाती येते." ते पुढे म्हणाले, "त्यांची गैरसोय होऊ नये आणि त्यांना कोणापुढे हात पसरावे लागू नये म्हणून हा उपक्रम राबवणे अत्यंत गरजेचे होते. १५० हून अधिक रुग्णालये असलेल्या या संघटनेच्या माध्यमातून निश्चितच प्रत्येक पत्रकाराला आणि त्याच्या कुटुंबाला योग्य व सवलतीच्या दरात उपचार मिळतील. यासाठी त्याला आता कोणाचेही पाय धरण्याची आवश्यकता नाही."**

**उरुळी कांचन (ता. हवेली) (दै. आरंभ पर्व)**

पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांना आरोग्यसेवेत मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य मराठी पत्रकार परिषदेचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन महाराज माथेफोड यांच्या विशेष प्रयत्नांमुळे, डॉक्टर वेलफेअर असोसिएशन, उरुळी कांचनने पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी (आई-वडील, पत्नी आणि मुले) वैद्यकीय उपचारांमध्ये ५० टक्के सवलत देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

ही सवलत १५० हून अधिक रुग्णालयांमध्ये उपलब्ध होणार असून, लवकरच ही योजना अंमलात येईल. डॉक्टर वेलफेअर असोसिएशनने सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून हा निर्णय घेतला असून, पत्रकारांच्या समाजातील योगदानाला दिलेली ही एक महत्त्वपूर्ण पावती आहे. प्रा. माथेफोड यांच्या अथक परिश्रमामुळे हे शक्य झाले आहे.

या निर्णयामुळे अनेक पत्रकार कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे. पत्रकार हे समाजाचा चौथा स्तंभ मानले जातात आणि अनेकदा ते स्वतःच्या आरोग्यापेक्षा आपल्या कर्तव्याला प्राधान्य देतात. अशा परिस्थितीत ही योजना त्यांच्यासाठी अत्यंत आश्वासक ठरणार आहे. या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून, इतर जिल्ह्यांमध्येही अशीच योजना लागू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

रविवारी झालेल्या एका कार्यक्रमात डॉक्टर वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गणेश आखाडे, उपाध्यक्ष डॉ. प्रशांत शितोळे, डॉ. उमा कथले, डॉ. शरद गोते, डॉ. परिमल परदेशी, डॉ. समीर ननावरे, डॉ. विजय फडतरे आणि डॉ. सुनील गांगुर्डे यांच्या हस्ते सवलतीचे पत्र उपस्थित पत्रकार सचिन सुंबे (राज्य मराठी पत्रकार संघटनेचे कार्याध्यक्ष), नितीन करडे (राज्य उपाध्यक्ष), भाऊसाहेब महाडिक, सहदेव खंडागळे, सुनील तुपे आणि चंद्रकांत दुंडे यांना प्रदान करण्यात आले.

या उपक्रमासाठी राज्य उपाध्यक्ष नितीन करडे, विजय लोखंडे आणि केंद्रीय अध्यक्ष मधुसूदन कुलथे यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचेही प्रा. माथेफोड यांनी नमूद केले. तसेच, पूर्व हवेली डॉक्टर असोसिएशन आणि वाघोली डॉक्टर असोसिएशन या संघटनांशीही चर्चा झाली असून, लवकरच त्यांच्याकडेही ही योजना लागू होईल, अशी माहिती त्यांनी दिली. ही योजना पत्रकार बांधवांसाठी एक मोठा आधार ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.